## ः आरती शंकराची ः

लवथवती विकाळा ब्रह्मांडीं माळा ।
वीषें कंठ काळा त्रीनेत्रीं ज्वाळा ॥
लावण्यसुंदर मस्तकीं बाळा ।
तेथुनियां जळ निर्मळ वाहे झुळझूळां ॥ 1 ॥

जय देव जय देव जय श्रीशंकरा । स्वामी शंकरा ।
आरती ओवाळूं तुज कर्पुरगौरा ॥ धृ ॥

कर्पुरगौरा भोळा नयनीं विशाळा ।
अर्धांगी पार्वती सुमनांच्या माळा ॥
विभुतीचें उधळण शिवकंठ नीळा ।
ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ॥ 2 ॥ जय देव ॥

देवीं दैत्यीं सागरमंथन पैं केलें ।
त्यामाजीं अवचीत हलाहल उठिलें ।।
तें त्वां असुरपणें प्राशन केले ।
नीळकंठ नाम प्रसिध्द झाले ॥ 3 ॥ जय देव ॥

व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी ।
पंचानन मनमोहन मुनिजन सुखकारी ।।
शतकोटीचें बीज वाचे उच्चारी ।
रघुकुळटिळक रामदासा अंतरीं ॥ 4 ॥ जय देव ॥